३

# उपेक्षित तरीही बालसाहित्य बालकांमध्ये मूल्य रुजविण्याचे कार्य करते.

अभ्यासक
**नीला धनंजय धडफळे**

मार्गदर्शक
**प्रा.डॉ. बाळकृष्ण लळीत**

## बालसाहित्य उपेक्षित तरीही बालसाहित्य बालकांमधे मूल्य रुजवण्याचे कार्य करते.

## सारांश

मराठी साहित्यात कथा, कविता, कादंबरी व आत्मचरित्र या साहित्य प्रकारांना जसे एक मानाचे स्थान आहे त्याचप्रमाणे या साहित्य प्रवाहात बालसाहित्याचे योगदानही खूप महत्वाचे आहे. पण तितक्याच खेदाने हे ही सांगावसे वाटते की बालसाहित्य मात्र त्या मानाने उपेक्षित राहिलेले आहे. जरी उपेक्षित असले तरी सध्या बालसाहित्याचा मराठी वाङःमयीन प्रवाहात नोंद घेण्याइतका ठसा उमटलेला आहे म्हणूनच आजही संगणकीकरणाच्या युगातही इसापनिती, चिऊ काऊ च्या गोष्टी टिकून आहेत. भा.रा. भागवतांच्या 'फास्टर फेणे' तर सगळ्यांचाच मनावर अधिराज्य करुन आहे. लहानपणापासूनच बालसाहित्याची आवड पुढे शिक्षिका या नात्यानेही बालकांशीच जास्त संपर्क आल्याने एम.ए.,एम.फिल पूर्ण केल्यानंतर पीएच.डी. साठीही ''भा.रा. भागवत व लीलावती भागवतांचे बालसाहित्यातील योगदान'' या विषयाचा प्रबंध सादर करण्याचे ठरविले आणि हा सारा अभ्यास करताना एक महत्वाची गोष्ट समोर आली ती म्हणजे बालसाहित्य हे उपेक्षित जरी असले तरी सुद्धा बालमनावर खूप चांगले संस्कार, मुल्ये रुजविण्याचे महत्वाचे काम करते.

## प्रस्तावना

लहापणापासूनच बालसाहित्याची खूप आवड होती. पुढे योगायोगाने आपटे प्रशालेतील शारदा बालक विहार या संस्थेची मुख्याध्यापिका म्हणून १७ वर्षे मी कार्यरत होते. त्यानंतर महेश विद्यालयातही २ वर्षे, काम केले त्यामुळे सतत बालकांशी संपर्क आला. त्यामुळे बालकांच्या विश्वाचे विविध कंगोरे, त्यांचे भावविश्व खूप चांगल्या रीतीने जाणून घेता आले अनुकरणशीलता ही बालमनावर किती सहजतेने रुजत जाते हे ही मला प्रत्यक्षपणे पाहता आले या बालकांच्या सहवासात रमताना 'रम्य ते बालपण' याचाही खऱ्या रीतीने  अनुभव घेता आला.



Vol: 5th, Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March. 2017,ISSN : 2319-5525

बालकांचे आचार विचार, त्यांची बुद्धी कुशलता, त्यांचा अवखळपणा, त्याच बरोबर त्यांच्या अबोध निरागस मानसिकतेचाही अभ्यास खूप जवळून करता आला होता. या बालविश्वात रमताना या बालकांकडून कविता, गाणी, नाट्यछटा विविध स्पर्धामधून या मुलांच्या कलागुणांना वाव देण्याचे कार्यही करता आले शिक्षणाची खूप आवड त्यामुळे एम.ए. पूर्ण झाल्यावर एम.फिल. करायचे ठरविले एम.फिल. ला 'भा.रा. भागवतांचा बालनायक फास्टर फेणे या विषयावर प्रबंध सादर केला. एम.फिल. पूर्ण झाल्यावर पीएच.डी. ची ओढ लागली. या साऱ्या प्रवाहात एक मन मात्र सातत्याने बालसाहित्याच्या विचारात गुंतलेले होते आणि बालसाहित्यावर भरीव योगदान देणाऱ्या भा.रा. भागवत आणि लीलावती भागवतांच्या बालसाहित्यावर अभ्यास करण्याचे ठरविले व पुढील प्रवास सुरु झाला.

<u>संशोधन समस्या विधान</u>

<u>भा.रा. भागवत व लीलावती भागवत यांच्या बालसाहित्यातील योगदानावर संशोधन.</u>

ध्येय – जे बालसाहित्य बालमनावर उत्कृष्ठ असे संस्कार आणि मूल्य रुजवतात तरीही या बालसाहित्याकला उपेक्षित का ठेवले जाते. ही उपेक्षितता दूर होऊन बालसाहित्यासाठी मराठी वाङःमयीन क्षेत्रात योग्य ते मानाचे स्थान मिळावे हेच मुख्य ध्येय पीएच.डी. चा अभ्यास करण्यापाठीमागचे आहे.

<u>महत्वाची उदिष्टे</u>

१) लेखकाची कृतीशीलता अभ्यासणे.

२) लेखकांनी राबविलेल्या उपक्रमाचा आढावा घेणे.

३) बालसाहित्य उपक्रमांची नवनिर्मिती करणे.

४) बालसाहित्य संशोधनात गुणात्मक व दर्जेदार अशी भर टाकणे.

५) भा.रा. भागवतांच्या बालमित्र मासिकाची निर्मिती व अडचणी अभ्यासणे.

६) स्थल मर्यादा लक्षात घेऊन भागवत दांपत्याच्या इतर साहित्याचा थोडक्यात आढावा घेणे त्यांच्या बालसाहित्याचा सखोल विचार करणे.

७) बालसाहित्याचे सर्जक भा.रा. भागवत व यांच्या बालसाहित्याबद्दलचा दृष्टीकोन अभ्यासणे.

माहिती संकलन

प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून माहिती संकलीत केली. प्राथमिक स्वरुपाची माहिती मुलाखतीच्या माध्यमातून संकलित केली. दुय्यम स्त्रोताची माहिती संबंधित विषयातील तज्ञ मंडळीची पुस्तके, संदर्भग्रंथ, पीएच.डी चे प्रबंध विविध लेखांच्या व इंटरनेटच्या माध्यमातून माहिती संकलीत केली.

संशोधनाची साधने

मुलाखती, प्रश्नावली निरिक्षण, चर्चा, गटचर्चा, विविध पुस्तके लेख संदर्भग्रंथाचे वाचन, सी.डी. टेप.

संशोधन पद्धती

हा अभ्यास करताना १) वर्णनात्मक समालोचनात्मक. २) पृथ्यकरणात्मक ३) संश्लेषणात्मक ४) विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यास केलेला आहे. बालसाहित्याची निर्मिती करणे तशी अवघड गोष्ट आहे. कारण वर्ल्ड बुक एनस्लायकोपेडिया मधील 'बाल' या संज्ञेनुसार जी व्याख्या स्पष्ट केली आहे ती व्याख्या Strictly Speaking child is any one who is not adult. त्यात बाल या संज्ञेत शिशू, बाल, किशोर, कुमार अशा बालपणातील सर्वच अवस्थांचा निर्देश करण्यात आला आहे. त्यामुळे बालसाहित्याची निर्मिती करताना त्या त्या अवस्थेचा विचार करुन साहित्य निर्मिती करावी लागते. बालसाहित्याची निर्मिती करताना कारागिरी ही करावीच लागते. भा.रा. भागवत व लीलावती भागवत या दोघांनीही बालसाहित्याची निर्मिती करताना विशिष्ट असा हेतू डोळ्यापुढे ठेवूनच बालसाहित्याची निर्मिती केल्याचे दिसून येते.

१९८० सालानंतर बालसाहित्याच्या प्रवाहाने जोर धरला अनेक बालसाहित्यकारांनी बालसाहित्य परिपूर्ण केले. त्यात भा.रा. भागवत व लीलावती भागवत या सर्जनशील दांपत्याचा समावेश आहे. भा.रा. भागवतांनी उत्तमोत्तोम विदेशी साहित्य रुपांतरित करुन भारतीय वाचकांना अतिशय उत्तम अशी पर्वणी उपलब्ध करुन दिली आहे तर लीलावती भागवतांनी कथा, काव्य, कादंबरी, नाटक, पाठ्यपुस्तकातील धडे परकीय बालसाहित्याचा अनुवाद अशा विविध माध्यमातून आपले साहित्य समृद्ध केले आहे. प्राणीकंथांच्या माध्यमाद्वारे बालकांना व्यवहार चातुर्य व सदाचारी बनण्याचा संदेश देणाऱ्या त्यांच्या कथांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

बालसाहित्याचे लेखन करताना बालकांच्या गुणधर्माचा सुद्धा प्रामुख्याने आपल्याला विचार करावा लागतो.



Vol: 5th , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March. 2017,ISSN : 2319-5525

**बालकांचे गुणधर्म**




फार प्राचीन काळापासून मौखिक कथा कथनाची प्रथा आढळते. पण त्याकाळी बालसाहित्याला वेगळे असे दालन नव्हते.

इंग्रज पूर्व भारतात रामायण महाभारत काव्यरुपे, कथा उपलब्ध होत्या. मराठी बालसाहित्याची सुरवात एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशीत सुरु झालेली दिसते, मुद्रणकला अस्तित्वात नसल्याने या वाङ्‌मयाचा प्रचार व प्रसार मर्यादित होता. बालकांसाठी मुद्दाम ग्रंथ लिहले जात नव्हते.

<u>बालसाहित्याचे अवलोकन शोध घेणारे ग्रंथ</u>

१) १९६४ साली मालतीबाई बेडेकर यांनी लिहलेले बालसाहित्याची रुपरेषा.

२) १९८२ लक्ष्मणशास्त्री जोशी संपादित मराठी विश्वकोश यातील बालसाहित्याविषयक लेखन.

३) १९८९ देविदास बागुल - महाराष्ट्रातील वाङ्‌मयीन प्रवाह - बालवाङ्‌मय.

४) बालसाहित्याच्या सर्जक निर्मात्या लीलावती भागवत - मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरुप.

५) मंदा खांडगे यांच्या स्त्री साहित्याचा मागोवा या संदर्भ ग्रंथातही बालसाहित्याचा मागोवा घेतलेला दिसून येतो.

६) १९९९ विश्वास वसेकरांनी - मराठी बालसाहित्य सृजन-समीक्षा दायित्व व प्रसार हा संपादित ग्रंथही खूपच उपयुक्त असा ठरेला आहे.

७) डॉ. सुलभा शाह यांनी लेखन केलेल्या बालसाहित्य स्वरुप आणि अपेक्ष या ग्रंथाने बालसाहित्याच्या अभ्यासकांना एक वेगळीच दृष्टी दिलेली आहे.

८) २००१ स्वाती राजे - बालसाहित्यातील बालकांची कल्पना हा प्रबंधही अभ्यासाला खूपच उपयुक्त ठरत आहे.

या पीएच.डी प्रबंधाच्या अभ्यासाच्या निमितत्ताने काही चांगले वाईट अनुभवही गाठीशी आले. आधीच बालसाहित्य उपेक्षित मग अशा बालसाहित्यावर पीएच.डी. करुन काय मिळणार असे उपरोधात्मक टीकेचे सूरही ऐकण्यास मिळाले.

विषयाबाबत झोलला पूर्वाभ्यास

| अ.क्र. | विषय | अभ्यासक |
|---|---|---|
| १ | १९ व्या शतकातील मराठी शालेय वाङ्‌मय त्याचे निर्माते त्याचा मराठी भाषेच्या घटनेवर झालेला परिणाम १९५३ (मुंबई विद्यापीठ) | कुळकर्णी कृष्णाजी भिकाजी |
| २ | बालनाट्य व त्याचा मराठीतील विकास १९७५ मराठवाडा विद्यापीठ | बोकील सुमन डी. |
| ३ | मराठी बालवाङ्‌मय स्वरूप अपेक्षा १९८० | सुलभा गोपाल शाह |
| ४ | मराठीतील मुलांची मासिके १९८२ ते १९८० संदर्भ आनंद एक अभ्यास | पुरंदरे लीला नारायण |
| ५ | हिन्दी तथा मराठी में चरित्रपर अभ्यास (१९८५) पुणे | विद्या गणपतराव निबांळकर |
| ६ | स्वातंत्र्योत्तर हिन्दी और मराठी बालसाहित्यः एक तुलनात्मक अभ्यास पुणे विद्यापीठ | दिलीप अच्चूत साधले |
| ७ | आधुनिक मराठी बालगीते बालकविता १९८५ ते १९४५ एक चिकित्सक अभ्यास १९८६ – मराठवाडा विद्यापीठ | शुभा भगवंत कुळकर्णी |
| ८ | मराठी बालकांचा वाङ्‌मय निर्मित ीचा चिकि त्सक अभ्यास – अमरावती विद्यापीठ | मंजिरी उमेश पत्की |
| ९ | स्वातंत्र्योत्तर काळातील बाल कथा साहित्य स्यरुप व चिंतन (नागपूर विद्यापीठ) १९९३ | छाया प्रकाश कावठे |
| १० | मराठी बालवाङ्‌मयात भा.रा. भागवत यांनी घेतलेली भर, जळगांव | सुलभा दे कुंवर |



Vol: 5th, Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March. 2017,ISSN : 2319-5525

अभ्यासाची व्याप्ती –

भा.रा. भागवत व लीलावती भागवत यांचे बालसाहित्यातील योगदान या विषयाची अभ्यास करताना त्याच्या सीमा लक्षात घेऊन त्यातील समावेशक साहित्याचा अभ्यास करता येईल. या विषयाचा सामाजिक, सांस्कृतिक भावनिक सीमा लक्षात घेणे आवश्यक ठरेल.

त्यांच्या साहित्यातील आशय अभिव्यक्ती यांचा सखोल विचार व दिशादर्शकता अभ्यासता येईल, त्यांच्या बालसाहित्यामुळे कोणती उदिष्टे साध्य होताना दिसतात याचा उल्लेख केला आहे. आवश्यकतेनुसार ग्रंथाचा आधार घेऊन काही सुत्रे सांगता येतील.

साहित्य समाज सापेक्ष असते समाजाचे प्रतिबिंब त्यात पडते तसेच भा.रा. भागवत व लीलावती भागवत यांचे साहित्याही त्या काळच्या समाजाचे प्रतिबिंब दाखविणारे तरीही त्यातील काही साहित्य आजच्या काळालाही साजेसे ठरणारे कसे ठरते याची नोंद घेतली जाईल.

बालसाहित्याचे स्वरूप अभ्यासले जाईल त्यात होत जाणाऱ्या बदलांची नोंद घेतली जाईल. भागवत यांच्या समकालीन लेखाकांचे साहित्य त्याचा थोडक्यात आढावा घेतला जाईल. साहित्यकारांच्या अंगचे सुप्त गुण ध्यानात घेता येतील.

भा.रा. भागवत व लीलावती भागवत यांचा बालसाहित्याची तुलना करता येईल भागवतकारांच्या बालसाहित्याला असलेल्या योगदानाची भरीव कामगिरी लक्षात घेतली जाईल.

भा.रा. भागवत व लीलावती भागवत यांचा बालसाहित्याची तुलना करता येर्ईल.

गृहितके –

१) बालसाहित्याची निर्मिती करताना साहित्यकाराला बालकांचे भावविश्व व बालकांच्या गरजाही लक्षात घ्याव्या लागतात.

२) बालसाहित्याने बालकांना निखळ आनंद मिळतो.

एकूण सहा प्रकरणातून  हा प्रबंध सादर केलेला आहे.

१) मराठी बालसाहित्य, स्वरूप व वाटचाल

२) भा.रा. भागवत व लीलावती भागवत यांच्या जडणघडणीचा व साहित्याचा मागोवा

३) भा.रा. भागवत व लीलावती भागवत यांच्या बालसाहित्यातील विषय व आशय

४) भा.रा. भागवत व लीलावती भागवत बालसाहित्यातील नायक व ठळक व्यक्तिरेखा

५) भा.रा. भागवत व लीलावती भागवत बालसाहित्यातील संस्कार व नीतीमुल्ये

६) उपसंहार व निष्कर्ष.

निष्कर्ष –

एकूणच पीएच.डी. च्या प्रबंधाचा अभ्यास केल्यावर या संदर्भातील काही महत्वाचे निष्कर्ष पुढे आले.

१) आधुनिक पिढीतील बालसाहित्यकारांना या योगदानाच्या अभ्यासामुळे बालसाहित्याची नवनिर्मिती करण्यासाठी हमखास प्रोत्साहन मिळेल आणि बालसाहित्याचा प्रचार आणि प्रसार अधिक प्रमाणात होईल.

२) अभिव्यक्ती आणि आशय या दृष्टीने बालजीवनाशी समरस होणारे साहित्य कसे असावे त्याचे महत्व पटून बालसाहित्याची नवनिर्मिती डोळसपणे होईल अशी खात्री वाटते.

३) भा.रा. भागवत व लीलावती भागवत यांनी विषयाची वैविध्य, वैचित्र्य किंवा प्रथमस्पर्धा साहित्य निर्मित केली, बालमनाचा सूक्ष्म निरीक्षणाची झलक साहित्यात कशी प्रतीत केली हे जाणून आधुनिक बाकल साहित्यात आणखी सुधारणा होईल.

समारोप –

आज मराठी साहित्यात बालसाहित्यात आपला ठसा उमटविण्याऱ्यामध्ये लेखकांमध्ये शोभा भागवत, संध्या मुधोळकर, नीलीमा गुंडी, अरुणा ढेरे, हेमा लेले, राजा मंगळवेढेकर, सुधारकर प्रभु, राजीव तांबे या लेखकांकडून बालसाहित्य निर्मितीच्या खूप अपेक्षा आहेत. आज पीएच.डी. पूर्ण करणे हे एक महत्वाचे ध्येय आहे. भा.रा. भागवतांनी व लीलावती भागवतांनी बालकांमधे जशी विज्ञानाची आणि पर्यावरणा संबंधी जागृती निर्माण होण्याची जी मुल्ये रुजवली आहेत ती अनमोलच आहेत नव्या मूल्य निर्मितीच्या जाणीवा बालकांमधे रुजविल्या जाव्यात हीच एक मोठी आशा आहे. बाल मेळावे व बालसाहित्य संभेलनातून अशाच नवनवीन संकल्पना पुढे येऊन उपेक्षित बाल साहित्यालाही अत्यंत उत्तम असे मराठी वाड्ःमयात मानाचे स्थान मिळावे हीच सदिच्छा आहे.

...



Vol: 5th, Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March. 2017,ISSN : 2319-5525